केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यातील
निवृत्तीवेतन धारकांना (रुपये२२५०/-पर्यंतचे
निवृत्तीवेतन + इतर देय रक्कम) शासकीय
<u>खर्चाने मनीऑर्डरने पाठविणेबाबत.</u>

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक :- संकिर्ण १००६/सं.क्र.२३७/कोषा-५,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक :- ०८ जून, २००९.

<u>प्रस्तावना</u> :- केंद्रिय वेतन धारकांचे रुपये २२५०/- पर्यंतचे निवृत्ती वेतन केंद्र शासनाच्या खर्चाने पाठविण्याबाबत, केंद्र शासनाच्या व्यय विभागाच्या महानियंत्रक लेखा नवी दिल्ली, यांच्या दिनांक २ जानेवारी, २००६ च्या परिपत्रकानुसार केंद्र शासनाच्या "कोषागार नियम खंड-१" मधे दुरुस्ती करण्यात आली आहे. याचप्रमाणे राज्य शासनाच्याही निवृत्ती वेतन धारकांना शासकीय खर्चाने मनीऑर्डरने पाठवावयाच्या सध्याच्या रकमेची मर्यादा वाढविण्याचा विचार शासनाच्या विचाराधिन होता.

<u>परिपत्रक</u> :- महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ च्या नियम ३४१ मध्ये राज्य शासनाच्या निवृत्त वेतन धारकांना मनिऑर्डरने निवृत्ती वेतन देण्याची तरतूद आहे. जेथे जिल्हा कोषागारे किंवा उपकोषागारे आहेत अशा ठिकाणांव्यतिरिक्त अन्य महाराष्ट्र राज्य शासकीय निवृत्ती वेतन धारकाचे रुपये १००/- पर्यंतचे निवृत्ती वेतन निवृत्ती वेतन धारकाच्या विनंतीनुसार शासकीय खर्चाने (मनीऑर्डरने) कमीशनची रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम पाठविली जाते. परंतु आता रुपये २२५०/- पर्यंतचे मूळ निवृत्तीवेतन अधिक त्यावरील देय होणारी महागाई वाढ रक्कम निवृत्तीवेतन धारकांस त्यांच्या विनंतीवरुन शासकीय खर्चाने मनीऑर्डरने पाठविण्यात यावे. यावरील खर्च राज्य शासनाच्या निवृत्तीवेतन धारकांसाठी "२०७१ निवृत्तीवेतन व इतर फायदे" या लेखाशिर्षाखाली व इतर राज्यांच्या निवृत्तीवेतन धारकांचा खर्च त्या त्या राज्यांच्या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा.

हे परिपत्रक वित्त विभागाच्या अर्थसंकल्प- १८ शाखेच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ७८/०९/ अर्थ-१८, दि. ३१/०३/२००९ सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००९०६०८१३३१४४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सु. सं. धपाटे )
अवर सचिव

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्याचे सचिव / उपमुख्यमंत्र्याचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
महालेखापाल (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महालेखापाल (लेखा परिक्षा)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई / वांद्रे,
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
उप संचालक, लेखा व कोषागारे, पुणे / नाशिक / नागपूर / औरंगाबाद / अमरावती / कोकण विभाग, नवी मुंबई,
वित्त विभाग (अर्थसंकल्प - १८), मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व उप कोषागार अधिकारी,
निवड नस्ती, वित्त विभाग, कोषा-प्र-५.